**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 173 B.N.S.S)**

## प्रथम खबर अहवाल
**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S. (पोलीस ठाणे):** करमाळा **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0234 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/03/2025 23:48 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्हयाची घटना):**

1 **Day (दिवस):** गुरूवार **Date from (दिनांक पासून):** 27/03/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 27/03/2025

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 11:35 तास **Time To (वेळेपर्यंत):** 12:34 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 27/03/2025 **Time (वेळ):** 23:38 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 050 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 27/03/2025 23:38 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पूर्व, 01 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** परिषद बांधकाम विभाग क्रमांक 2, करमाळा, ,करमाळा,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

6.

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

**Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** निलेश बबन पवार

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1979

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शिराळ टें, , ता माढा , टेंभुर्णी , सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | शिराळ टें, , ता माढा , टेंभुर्णी , सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9021305980

**7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | बबन हिरालाल गायकवाड | | | 1. फ्लट नं306,ग्रीष्म अपार्टमे,Town/Village (शहर / गाव): करमाळा,Tehsil (तहसील): करमाळा,जिसोलापूर,Police Station (पोलीस ठाणे): करमाळा,District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

**11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्यादी जबाब दि.27.03.2025

मी निलेश बबन पवार, वय- 46 वर्षे, व्यवसाय – कॉन्ट्रक्टर, रा. शिराळ (टें), ता. माढा जि. सोलापूर मो.नं. 9021305980 समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की,

मी वरील ठिकाणी माझ्या कुटूंबासह राहणेस असून, श्री अमोल कैलास यादव रा. टेंभुर्णी, ता. माढा जि. सोलापूर हे रोड कॉन्ट्रॅक्टर असून त्यांच्याकडे मी माझ्या उपजिवीकेसाठी सुपरवायझर म्हणून काम पहातो. श्री अमोल यादव यांनी 1) वांगी नं. 2 ते इजिमा 12 रस्ता सुधारणा करणे 2) वरकुटे ते साडे रस्ता सुधारणा 3) विट चोपडे वस्ती ते झरे रस्ता सुधारणा करणे अशा कामांबाबत जिल्हा परिषद बांधकाम विभाग, क्रं. 2, अर्तंगत ऑनलाईन ई-निवीदा अधिकृत वेबसाईटवर प्रकाशित केल्यावर सदर ई निवीदा प्रक्रियेत रितसर सहभाग घेतलेला होता. सदर ई-निवीदा प्रक्रियेनुसार वरील तिन्ही कामे कॉन्ट्रक्टर श्री अमोल कैलास यादव यांना मिळाली होती. त्यानंतर 1) वांगी नं. 2 ते इजिमा 12 रस्ता सुधारणा करणे कामाचे बिल रु. 11,84,857 असे असलेली वर्क ऑर्डर दि. 13/09/2024 रोजी मिळाली होती. 2) त्यानंतर दि. 14/10/2024 रोजी वरकुटे ते साडे रस्ता सुधारणा करणे कामाचे बिल रु. 19,79,222/- व 3) दि. 15/10/2024 रोजी विट चोपडे वस्ती ते झरे रस्ता सुधारणा करणे कामाचे बिल रु. 11,87,028/- प्रमाणे वर्क ऑर्डर मिळाल्यानुसार सदरचे काम सुरु केले होते. सदर तिन्ही कामात मी कॉन्ट्रक्टर श्री अमोल यादव यांच्यातर्फे सुपरवायझरचे काम करत होतो. सदर कामे कामगारांकडून पुर्ण करणे, कामावर देखरेख ठेवणे तसेच सदर कामाच्या बिला संबंधी जिल्हा परिषद बांधकाम विभाग, क्रं. 2, कार्यालयात पाठपुरावा करण्याचे काम मी पहात होतो. सदरबाबत अमोल यादव यांनी मला संमतीपत्र दिले आहे. वरील नमुद तिन्ही कामे चालु असून सदर झालेल्या कामाच्या टप्प्यानुसार कामाची बिले मिळत असतात. वरील तिन्ही कामाचे मेझरमेंट बुक (एम.बी) नुसार बिल मिळण्यासाठी मी जिल्हा परिषद बांधकाम विभाग, क्रं. 2, कार्यालयात पाठपुरावा करत होतो. सदर बिलापैकी वांगी नं. 2 ते इजिमा 12 रस्ता सुधारणा करणे या कामाचे प्राथमिक बिल रु. 5,87,861/- दि.10/03/2025 रोजी मिळाले होते. उर्वरित बिल मिळण्यासाठी मी श्री बबन गायकवाड, शाखा अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, क्रं. 2, करमाळा यांच्याकडे उप-अभियंता, करमाळा येथील अतिरीक्त कार्यभार असल्याने त्यांच्या स्वाक्षरी झाल्यानंतर सदरचे बिल जिल्हा परिषद यांच्याकडे अंतिम मंजूरीसाठी जात असल्याने त्यांच्याकडे पाठपुरावा करत होतो.

काल दि. 26/03/2025 रोजी दुपारी 02.00 वा चे सुमारास मोटार सायकलवरुन मी बिलासंदर्भात जिल्हा परिषद बांधकाम विभाग, क्रं. 2, करमाळा कार्यालयात श्री गायकवाड साहेबांना भेटण्यासाठी गेलो असता, ते घरी असल्याचे समजल्याने मी यापुर्वी कामानिमित्त त्याचे घरी गेलो असल्याने मी गायकवाड साहेबांना भेटण्यासाठी त्याचे फ्लॅट नं. 306, ग्रिष्मा अपार्टमेंट, करमाळा येथे जाऊन भेट घेतली असता, गायकवाड साहेबांनी आमच्या बिल मंजूरीसाठी स्वाक्षरी करुन पाठवण्यासाठी माझ्याकडून रु. 30,000/- लाचेची मागणी केली. सदरची रक्कम दिल्याशिवाय बिल मंजुरीसाठी पाठवणार नसल्याचे सांगितले. त्यावेळी मी आमचे कॉन्ट्रक्टर अमोल यादव यांना विचारुन येतो असे सांगून निघुन आलो. त्यानंतर मी अमोल यादव यांना लाच मागणीबाबत सांगितले.
आम्हाला लाच देण्याची इच्छा नसल्याने मी आज दि. 27/03/2025 रोजी सकाळी अॅन्टी करप्शन ब्युरोचे पोलीस निरीक्षक गणेश पिंगुवाले यांना फोन करुन संपर्क साधला व माझी तक्रार सांगितली. त्यानंतर आज दि 27/03/2025 रोजी सकाळी 12.05 वाचे सुमारास पोनि पिंगुवाले व त्यांचे पथक करमाळापासुन 7 कि.मी. अलीकडे कुर्डुवाडीकडे जाणाऱ्या रोडच्या बाजुस येऊन माझी भेट घेतली. त्यावेळेस पोनि पिंगुवाले यांनी त्यांची ओळख सांगून त्यांच्या सोबत असलेल्या दोन्ही पंचाची ओळख

करुन देवून मला माझी तक्रार पंचा समक्ष विचारुन घेतली. त्यावेळेस मी कॉन्ट्रक्टर श्री अमोल यादव यांचे 1) वांगी नं. 2 ते इजिमा 12 रस्ता सुधारणा करणे 2) वरकुटे ते साडे रस्ता सुधारणा 3) विट चोपडे वस्ती ते झरे रस्ता सुधारणा करणेबाबत मिळालेल्या कामाचे प्राथमिक बिल रक्कम मंजूरीसाठी श्री बबन गायकवाड, शाखा अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, क्रं. 2, करमाळा यांनी माझ्याकडे रु. 30,000/- लाच म्हणून मागणी करीत असल्याबाबतची त्यांच्याविरुध्द लेखी तक्रार दिली. सदर लेखी तक्रारीवर पोनि पिंगुवाले व दोन्ही पंचानी वाचून सहया केल्या.

सदरवेळी पडताळणी कारवाई करण्याच्या अनुषंगाने पोनि. पिंगुवाले यांनी मला गायकवाड साहेब यांची कोठे भेट होऊ शकते याबाबत विचारले असता, मी त्यांना ते पंचायत समिती करमाळा येथील त्यांचे ऑफिस असून ते तेथेच भेटतील असे सांगितले. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर व नवीन मेमरीकार्ड दाखवून त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचांना देवून व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकून त्यामध्ये त्यामध्ये यापुर्वी कोणतेही रेकॉर्डीग नसल्याचे खात्री करून दिली मला व पंच क्र.1 यांना योग्य त्या सुचना देवुन, व्हाईस रेकॉर्डर चालू करुन तो माझे गळयात अडकवून मला बबन गायकवाड यांची भेट घेण्याकरीता पंच क्र.1 यांच्यासह माझे मोटार सायकल क्र. एमएच 45 बीए 1571 वरुन 12.36 वाजता रवाना केले. मी व पंच क्र.1 दोघे पंचायत समिती करमाळा येथील बांधकाम विभागाच्या कार्यालयात गेलो असता, सदर ठिकाणी गायकवाड साहेब हे तेथे दिसून न आल्याने मी त्यांना माझ्या मोबाईल क्र.9021305980 वरुन गायकवाड साहेब यांचा मोबाईल क्र.8080213644 या नंबरवर कॉल करुन मोबाईल स्पिकरवर ठेवून गायकवाड साहेब आलतो असे बोललो असता, त्यावेळसे गायकवाड साहेबांनी मला हाय रुमवर ये असे म्हणून फोन बंद केला. त्यानंतर 12.48 वा.चे सुमारास मी व पंच पुन्हा माझ्या मोटार सायकलवरुन गायकवाड साहेब राहत असलेल्या फ्लॅटकडे गेलो. सदर फ्लॅटच्या पार्कीगमध्ये मोटारसायकल पार्कीग करुन शिडीवरुन चालत जावून तिसऱ्या मजल्यावर फ्लॅट क्र.306 च्या आतमध्ये गेलो. त्यावेळेस गायकवाड साहेब हे त्यांच्या रुममध्ये एका टेबलसमोर खुर्चीवर बसून कार्यालयाचे काम करत होते. त्यावेळेस मी त्यांना कामाचा विषय काढून मालकाला बोललोय मी ¨..... म्हणले मटरेल तुमच्या मनांन सगळ भरपूर वापरलय कट कायतरी ही करा.. असे बोलून कामाबाबत चर्चा केली असता, त्यावर गायकवाड साहेब म्हणाले, बर..बर. चालतय, तुमच्या मणान करा, बास का तुमाला जे योग्य वाटतय ते करा बास का, त्यावर मी त्यांना, मी काय आता मी चाललोय विटच्या कामाकड.. पोरग येईल आमच सुपरवायजर कोणीतरी, त्यावर गायकवाड साहेब म्हणाले की, बर..बर.. तुमच्या मणानी करा बास का, त्यावर मी त्यांना, तुमी सांगा आकडा..मी तेला सांगुन जातो, त्यावर गायकवाड साहेबांनी हं..आता मी तुमाला किती सांगितलं..तीस हजार काय ते सांगितल होत. मग तुमच्या मनान काय ते पाडुन सांगा, त्यावर मी, आता ती तुमच्यावर आहे ती किती सांगा.. त्यावर गायकवाड साहेब म्हणाले की, 30 सांगितल होतं काय.. 20 करा..माझ तुमच काय..हं.. असे बोलून काल माझ्याकडे रु. 30000/- लाच मागणी केलेबाबत सांगून आता रु. 20000/- दया असे बोलून रु. 20000/- लाचेची मागणी केली. त्यावर मी, ठिकाय काय हरकत नाय.. असे बोलून तासाभरात येतो असे म्हणून मी व पंच क्र.1 असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो त्यावेळी पोनि पिंगुवाले यांनी माझ्या गळ्यातील व्हॉईस रेकॉर्डर काढुन 13.18 वा बंद करुन ताब्यात घेतला. त्यानंतर मी वरील हकिगत सांगितली. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी व्हाईस रेकॉर्डर

त्यांच्याकडील लॅपटॉपला जोडून त्यामधील संभाषण रिव्हर्स-फॉरवर्ड करुन, पंच क्र.1 यांचेकडे लाच मागणी बाबतची विचारपुस करुन, पंच क्र.2 यांचे समक्ष खात्री केली.

सदर पडताळणी कारवाईदरम्यान गायकवाड साहेब यांनी माझ्याकडे 20,000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने पोनि. पिंगुवाले यांनी गायकवाड यांच्यावर सापळा कारवाई करण्याचे ठरवून सापळापुर्व कारवाईबाबत माहिती देऊन मला व पंचाना अँथ्रासिन पावडरच्या गुणधर्माबाबत माहिती देवून प्रात्यक्षिक दाखवले, सदर वेळी मी हजर केलेले 20,000/- रू. रक्कमेच्या नोटांचे नंबर स्टाफकरवी एका कागदावर लिहुन त्यावर सह्या करुन तो कागद पोनि पिंगुवाले यांनी ठेवला. त्यानंतर सदर नोंटांना अँथ्रासिन पावडर लावुन सापळापुर्व कारवाई पुर्ण करुन सदरच्या नोटा माझ्या पॅन्टच्या डाव्या बाजूच्या पुढील खिशात ठेवले. त्यानंतर पोनि. पिंगुवाले यांनी मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदारांना त्यांच्या कामाच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू करुन माझ्या गळयात 14.00 वाजता माझ्या मोटारसायकल क्र. एमएच 45 बीए 1571 वरुन रवाना केले. आमच्या पाठोपाठ पोनि पिंगुवाले हे पंच क्र.2 व सापळा पथकासह शासकिय वाहनाने आमच्या पाठीमागे येवून गायकवाड साहेब राहत असलेल्या ग्रिष्मा अपार्टमेंटच्या आलीकडे शासकीय वाहनातून उतरुन पायी चालत ग्रिष्मा अपार्टमेंटकडे आले. त्यावेळेस मी व पंच नं.1 पायऱ्यांवरुन पायी चालत तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅटकडे निघालो. आमच्या पाठोपाठ पोनि पिंगुवाले, व सापळा पथकातील कर्मचारी व पंच क्र. 2 असे कोणालाही संशय येणार नाही अशा रितीने फ्लॅट नं.306 च्या बाहेर पायऱ्यांवर व लिफ्टच्या समोर सापळा लावून थांबून राहिले.

मी व पंच क्र. 1 असे दोघे फ्लॅट नं.306 मध्ये जावून गायकवाड साहेब बसलेल्या रुममध्ये गेलो. रुममध्ये गेल्यानंतर गायकवाड साहेब बसलेल्या बेडरुममध्ये गेलो असता, सदर ठिकाणी आणखी 5 ते 6 व्यक्ती हजर होत,त्यांची नावे साहेबांनी नोंदवून घेतली. आमचे कामाचे अनुषंगाने गायकवाड साहेबांकडे गेल्यानंतर मी बोललो ओ साहेब... त्यावर गायकवाड साहेब हां... असे बोलले. त्यानंतर गायकवाड साहेब यांनी उजव्या हाताचा अंगठा तर्जनीवर घासुन इशा-याने पैश्याची मागणी केली. त्यावेळी मी मोजून घ्या वीस हजार रुपये आहेत..असे म्हणालो.त्यावर गायकवाड साहेब आं.. असे म्हणल्यावर मी पुन्हा वीस हजार आहेत मोजून घ्या म्हणल.. त्यावर गायकवाड साहेब बरं चालतय.. असे बोलुन 20,000/- रु. लाच रक्कम उजव्या हाताने स्विकारुन त्यांच्या डाव्या हाताने पॅन्टच्या डाव्या बाजुच्या पुढील खिशात ठेऊन घेतले. त्यानंतर ठरल्याप्रमाणे पंच क्र.1 भांगे यांनी पोनि/पिंगुवाले यांना मिसकॉल देवुन लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा दिला. त्यावेळी पोनि पिंगुवाले व सापळा पथक आत येवून पोनि पिंगुवाले यांनी गायकवाड साहेब यांना ताब्यात घेतले आणि पोनि पिंगुवाले यांनी माझे गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढून तो बंद करुन ताब्यात घेतला. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी गायकवाड यांना नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव बबन हिरालाल गायकवाड, वय-57 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद-शाखा अभियंता, प्रभारी उप अभियंता, नेमणुक-बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, करमाळा. रा.फ्लॅट नं.306, ग्रीष्म अपार्टमेंट, करमाळा, जि.सोलापूर. मुळ रा. फ्लॅट नं.302, साई समर्थ अपार्टमेंट, केशव नगर, मुंढवा, पुणे. असे सांगितले. त्यानंतर पोनि. पिंगुवाले यांनी गायकवाड यांचे ताब्यातून स्विकारलेली लाच रक्कम पंचासमक्ष हस्तगत केली आणि सदर ठिकाणी सापळ्यातील प्राथमिक तपासण्या बाजूच्या बेडरुम क्र. 2 मध्ये

करण्यात आल्या. त्यानंतर गायकवाड साहेब यांना सापळा कारवाई झालेबाबत त्यांची पत्नी सौ. विमल बबन गायकवाड यांना माहिती देवून पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर आवश्यक कार्यवाही शासकीय विश्राम गृह करमाळा येथे जावून पुर्ण करण्यात आले.

तरी आज दि.27/03/2025 रोजी 11.35 ते 14.30 वा चे दरम्यान लोकसेवक श्री बबन हिरालाल गायकवाड, वय-57 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद-शाखा अभियंता, अतिरीक्त कार्यभार- उप अभियंता, नेमणुक- जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्रमांक 2, करमाळा, जिल्हा परिषद सोलापूर, रा.फ्लॅट नं.306, ग्रीष्म अपार्टमेंट, करमाळा, जि.सोलापूर यांनी जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्रमांक 2 अंतर्गत केलेल्या कामाचे बिल काढल्याचा मोबदला तसेच उर्वरित दोन कामाचे प्राथमिक बिल काढण्याकरीता म्हणुन स्वत:करीता कायदेशीर परिश्रमिकाखेरीज अन्य पारितोषण म्हणुन माझ्याकडे रु. 30,000/- लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 20,000/- लाच रक्कम स्वत: स्विकारून बेकायदेशीर आर्थिक फायदा मिळवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणून माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा आपले कडील असलेल्या लॅपटॉपवर टंकलिखीत करण्यात आलेला असून त्याची प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

हा फिर्यादी जबाब दिला. स.ता.म.

समक्ष

(गणेश पिंगुवाले)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Vinod Prabhu Ghuge (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

(4)

**Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Vinod Prabhu Ghuge

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** PI

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(से.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1968 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्यंग वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)**